# मुंबई विद्यापीठ

दूरध्वनी नं:—०२२—२२८७३६९६
वेबसाईट :—www.nssmu.org.in
राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
विद्यापीठ विद्यार्थी भवन,
२ रा मजला, 'बी' रोड,
**चर्चगेट, मुंबई — ४०० ०२०.**

पत्र क्र.रासेयो/२९२/२०१८—१९
दिनांक :२९ ऑगस्ट, २०१८

प्रति,
प्राचार्य, रा.से.यो. अंतर्गत मुंबई विद्यापीठ अधिनस्त सर्व महाविद्यालये.

**विषय : युवा माहिती दूत**

मा. महोदय,

महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाद्वारे तयार करण्यात आलेल्या युवा माहिती दूत या मोबाईल ॲप द्वारा योजनेची अंमलबजावणी करणे अपेक्षित असून, प्रत्येक महाविद्यालयामध्ये एक मार्गदर्शक नेमायचा आहे. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी स्वत: या ॲप्लीकेशनवर स्वत:ची नावनोंदणी करावयाची असून, सहा महिन्याच्या कालावधीत किमान ५० प्रस्तावीत लाभार्थ्यांच्या घरी जावून त्यांच्याशी संपर्क साधून, त्यांच्यासाठी लागू असणाऱ्या शासकीय योजनांची माहिती त्यांना द्यावी व यासाठी प्रोत्साहन म्हणून सदर विद्यार्थ्यास **युवा माहिती दूत** अशी ओळख राज्य शासनाच्या वतीने देण्यात येईल. तसेच त्यांना शासनाचे Digital Certificate अदा करण्यात येईल.

माहिती दूत हे ॲप Google play store मधून डाउनलोड करावे व त्याद्वारे कार्यवाही सुरु करण्यासाठी कार्यक्रम अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहीत करावे.

महाविद्यालयांना User-Id & Password माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या कार्यालयातून ईमेल केलेले आहेत. तथापि ईमेल प्राप्त झाले नसल्यास mahitidoot.guide@gmail.com येथून प्राप्त करावेत व आपल्या महाविद्यालयातील प्रत्येक विद्यार्थी यामध्ये सहभागी होईल याची खात्री करावी. सदर रा.से.यो. स्वयंसेवकास विद्यापीठ स्तरावरचे २० तास अंतर्गत कार्य केल्याचे अधोरेखित करावे.

म. मुख्यमंत्री यांच्या कार्यालयातून या कार्यप्रणालीवर नियंत्रण असल्यामुळे आपल्या उपक्रमांमध्ये याचा समावेश करावा व कार्यवाही करावी. सहा महिन्यानंतर महाविद्यालयांनी या योजनेचा अहवाल विद्यापीठांना सादर करणे अनिवार्य आहे. कृपया याची नोंद घ्यावी.

आपला विश्वासू ,

प्रा. बाबासाहेब स. बिडवे
कार्यक्रम समन्वयक, रा.से.यो. विभाग

सोबत : युवा माहिती दूत मार्गदर्शक सूचना.